राज्यसेवा परीक्षा अंतिम निकालाच्या आधारावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या शिक्षणाधिकारी व तत्सम, गट अ आणि उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट ब संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षण (सीपीटीपी) कालावधीमधील ठोक वेतन अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- बिंदूना-३०१६/प्र. क्र.२००/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १७ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ :-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- टिआरएन २०१३/प्र.क्र.८४/१३/ १२-अ, दिनांक २० जानेवारी, २०१४
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- पदनि २०१६/प्र.क्र. ७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २० फेब्रुवारी, २०१६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेद्वारे सन २०१४ पासून प्रतिवर्षी सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ मधील पदांसाठी यशदा, पुणे या संस्थेमार्फत व गट ब मधील पदांसाठी वनामती, नागपूर या संस्थेमार्फत दोन वर्षांच्या कालावधीसाठी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने या विभागांतर्गत असणाऱ्या शिक्षणाधिकारी व तत्सम, गट अ आणि उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट ब संवर्गामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा (मुख्य) परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांसाठी ठोक रक्कम अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा (मुख्य) परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिक्षणाधिकारी व तत्सम, गट-अ (प्रशासन शाखा) व उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब (प्रशासन शाखा) या संवर्गातील पदावर नियुक्तीसाठी निवड झालेले जे उमेदवार प्रशिक्षणासाठी अनुक्रमे यशदा पुणे व वनामती, नागपूर येथे हजर होतील त्यांना सामान्य प्रशासन विभागाने ठरवून दिलेल्या दरानुसार ठोक वेतन देणे आवश्यक आहे. शिक्षणाधिकारी व तत्सम, गट-अ (प्रशासन शाखा) या पदावर राज्यसेवा परीक्षेमार्फत यशदा, पुणे येथे होणाऱ्या उमेदवारांचे ठोक वेतन अदा करण्यासाठी हजर शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे व उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब (प्रशासन शाखा) या पदावर राज्यसेवा परीक्षेमार्फत वनामती, नागपूर येथे हजर होणाऱ्या उमेदवारांचे ठोक वेतन अदा

करण्यासाठी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्रमांक २०१७१११८१५३११२१८२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2017.11.18 15:34:06 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल - १ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०.
२. महालेखापाल - १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०.
३. महालेखापाल - २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
४. महालेखापाल - २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे.
८. महासंचालक, वंसतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, बोले पेट्रोल पंप जवळ, अमरावती रोड, धरमपेठ, नागपूर - ४४२ ४१०.
९. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
१०. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे / नागपूर.
१३. वित्त विभाग (वित्तीय सुधारणा - १), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती.